ePaper


**Covid च्या नव्या व्हेरिएंटचा धूमाकुळ; शास्त्रज्ञांकडून धोक्याची घंटा**



वर्ष - 7 । अंक -66 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**


- ‘शहर राष्ट्रवादी’त फूट?
- शरद पवारांच्या निवासस्थानाबाहेर गर्दी
- ‘सीएमई’ हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा ‘हिरवा कंदील’!


www.mahaenews.com । बुधवार, दिनांक 5 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# शरद पवार-अजित पवार पुन्हा एकत्र येणार!

## » दोन्ही गटाकडून आयोजित बैठकीवर भाष्य करताना रोहित पवार यांचे विधान

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पवार व अजित पवार एकत्र येण्यास अजूनही संधी आहे, अशी प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली. दोन्ही गटाकडून आयोजित केलेल्या बैठकीवर भाष्य करताना रोहित पवार म्हणाले, “त्यांची (अजित पवार गट) बैठक भुजबळ सिटीला आहे. तर शरद पवारांनी वाय बी सेंटरला बैठक बोलावली आहे. म्हणजे बैठकीचं ठिकाण निवडतानाच किती मोठा फरक आहे, ते बघा. या महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, ज्यांनी महाराष्ट्रासाठी खूप काही केलं आहे. त्यांच्या नावाने असलेल्या सभागृहात शरद पवार बैठक घेणार आहेत. तिथेच सर्व पदाधिकारी आणि आमदार-खासदार येतील.”**

अजित पवारांसह काही आमदारांनी बंडखोरी केल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली आहे. उद्या (बुधवार, ५ जुलै) अजित पवार गट आणि शरद पवार गटाकडून बैठक बोलावण्यात आली आहे. अजित पवार गटाने मुंबईतील भुजबळ नॉलेज सिटी येथे बैठकीचं आयोजन केलं आहे. तर शरद पवार गटाकडून मुंबईतील वाय बी चव्हाण सेंटर येथे बैठकीचं आयोजन केलं आहे. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व नेते, आजी-माजी आमदार-खासदार, पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावं, असं आवाहन दोन्ही गटाकडून करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि शरद पवार गटाचे समर्थक रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार व शरद पवारांनी एकत्र राहिलं पाहिजे, अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. यावर तुमचं मत काय? असं विचारलं असता रोहित पवार पुढे म्हणाले,”माझंही मत असंच आहे की, अजित पवारांनी शरद पवारांबरोबर राहायला हवं होतं. दोघं एकत्र येण्याची अजूनही संधी आहे. पण पुढे बघू काय होतंय ते. शेवटी जे काही होणार आहे, ते होणारच आहे. ते झाल्यानंतर शरद पवार जो निर्णय घेतील, तो निर्णय आम्हाला स्वीकारावा लागेल.” अशा स्थितीत कोणाच्या सभेत किती आमदार पोहोचणार. ते त्यांचे खरे समर्थक असतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत मंगळवारी झालेल्या शासकीय बैठकीला अजित पवार यांनीही हजेरी लावली. कोणाच्या गटात किती आमदार आहेत हे समजू शकत नाही.

जास्तीत जास्त आमदारांनी आपल्या बैठकीला उपस्थित राहावे म्हणून पक्षाध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून मंगळवारी प्रयत्न सुरू होते. अजित पवार यांच्या बंडानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांची बैठक उद्या होत आहे. पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली आहे. अजित पवार गटाने वांद्रे येथील भुजबळ यांच्या संस्थेच्या सभागृहात बैठक आयोजित केली आहे.



**» पुतण्याचे वार, नातू झाला ढाल!**

» पान 5 वर

> ”माझंही मत असंच आहे की, अजित पवारांनी शरद पवारांबरोबर राहायला हवं होतं. दोघं एकत्र येण्याची अजूनही संधी आहे. पण पुढे बघू काय होतंय ते. शेवटी जे काही होणार आहे, ते होणारच आहे. ते झाल्यानंतर शरद पवार जो निर्णय घेतील, तो निर्णय आम्हाला स्वीकारावा लागेल.”
>
> **-रोहित पवार,** आमदार, कर्जत-जामखेड

### अजित पवार यांचे समर्थक (24)

» छगन भुजबळ, दिलीप वासले पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, अदिती तटकरे, संजय बनसोडे, अनिल पाटील, धर्मरावबाबा आत्राम, सुनील टिंगरे, अण्णा बनसोडे, दत्ता भरणे, बबन दादा शिंदे, दीपक चव्हाण, राजेंद्र कोरेमारे, नितीन पवार, संग्राम पवार, डॉ., राजेश पाटील, सुनील शेळके, दिलीप मोहिते, अतुल बेनके, इंद्रनील नाईक, शेखर निकम, यशवंत माने. आदी.

### शरद पवार समर्थक (13)

» जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, रोहित पवार, बाळासाहेब पाटील, मकरंद पाटील, प्राजक्त तनपुरे, राजेश टोपे, अनिल देशमुख, संदीप क्षीरसागर, सुमनताई पाटील, सुनील भुसारा, राजेंद्र शिंगे, मानसिंग नाईक.

### जे अद्याप कोणत्याही गटात नाहीत (15)

» चंद्रकांत नवघरे, माणिकराव कोकाटे, दिलीप बनकर, आशुतोष काळे, प्रकाश सोळंकी, बाळासाहेब आजबे, बाळासाहेब पाटील, किरण लहामटे, नीलेश लंके, दौलत दरोडा, अशोक पवार, नरहरी झिरवाळ, मनोहर चंद्रिकापुरे, नवाब मलिक.

### संख्याबळाचे चित्र आज स्पष्ट होणार

» पक्षाच्या ५३ आमदारांपैकी किती आमदार कोणत्या गटाबरोबर आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. अजित पवार गटाने ४० पेक्षा अधिक आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा केला आहे. बैठकीला उपस्थित राहावे म्हणून शरद पवार व जयंत पाटील यांच्याकडून आमदारांशी दिवसभर संपर्क साधण्यात येत होता. अजित पवार यांच्याकडूनही आमदारांना बैठकीचे निरोप देण्यात आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसला पुढील दिशा देण्यासाठी ८३ वर्षांचा तरुण योद्धा म्हणजेच पक्षाध्यक्ष शरद पवार हे उद्या मार्गदर्शन करणार आहेत. तरी सर्वांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी केले आहे.

# ‘शहर राष्ट्रवादी’त फूट?

## पुण्यात आज लोकप्रतिनिधींसह प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक

।बारामती। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**आज शहर राष्ट्रवादीची पुण्यात बैठक होणार आहे. लोकप्रतिनिधींसह प्रमुख कार्यकर्त्यांना निमंत्रण देण्यात आले आहे. या बैठकीत नेमकं आता काय होतंय याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. अजित पवार यांच्या बंडामुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेसमधील कोणकोणते नेते, पदाधिकारी शरद पवार यांच्यासोबत आहेत, याचा अंदाज घेण्यासाठी शहर राष्ट्रवादी काँग्रेसने घोले रस्ता येथे मंगळवारी दुपारी बैठकीचे आयोजन केले आहे.**



आजी-माजी आमदार, खासदार, नगरसेवक, पदाधिकारी तसेच प्रमुख कार्यकर्त्यांना निमंत्रण देण्यात आले आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित न राहणाऱ्या पदाधिकारी शरद पवारांसोबत नसल्याचे ‘मेसेज’ पक्षनेतृत्वापर्यंत पोहोचवला जाणार आहे.

शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घोले रस्त्यावरील नेहरू सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आली आहे. पक्षाच्या कार्यकारिणीतील सर्व पदाधिकाऱ्यांना या बैठकीचे निमंत्रण देण्यात आले आहे. अजित पवार गटाकडून पक्षाचा दावा करण्यात आल्याने शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून प्रतिज्ञापत्र भरून घेतले जाणार आहे. त्यासाठीची तयारी शरद पवार गटाकडून या बैठकीत गेली जाण्याची शक्यता आहे.

अजित पवार गटाकडून ‘राष्ट्रवादी’च्या प्रदेशाध्यक्षपदी सुनील तटकरे यांची नियुक्ती केल्याने त्यांच्याकडून स्वतंत्र कार्यकारिणी जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. शिंदे-ठाकरे गटाप्रमाणे ‘राष्ट्रवादी’चेही दोन शहराध्यक्ष, दोन कार्यालये; तसेच पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाण्याची शक्यता आहे. ही शक्यता गृहीत धरून शरद पवार गटाकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. निवडणूक आयोगापुढे भविष्यात पक्ष आणि चिन्ह याचा दावा होण्याच्या शक्यतेने सर्वोतोपरी काळजी घेण्यात येत आहे.

### उलटसुलट चर्चा

**दीपक मानकर, सुभाष जगताप, बाबुराव चांदेरे, महेंद्र पठारे, नीलेश निकम, दिलीप बराटे, दत्तात्रेय धनकवडे, कुमार गोसावी, श्रीकांत पाटील आदी स्थानिक नेत्यांकडून मंगळवारच्या बैठकीबाबत काय भूमिका घेतली जाते, याबाबत उलटसुलट चर्चा आहे. यातील किती नेते शरद पवार गटाने बोलावलेल्या बैठकीस उपस्थित राहणार, याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उत्सुकता आहे.**

---

## शरद पवारांच्या निवासस्थानाबाहेर गर्दी

### कार्यकर्त्यांचे शक्तिप्रदर्शन, पण आमदारांचा वेगळा निर्णय?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडानंतर कराडला स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस्थळाकडे रवाना होणाऱ्या शरद पवार यांना त्यांच्या पुण्यातील निवासस्थानाबाहेर भेटण्यास स्थानिक कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सोमवारी सकाळी गर्दी केली होती. जोरदार घोषणाबाजी करत स्थानिक कार्यकर्त्यांनी पवार यांना आपला पाठिंबा दर्शवला होता. दरम्यान, पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्हीही आमदारांनी या प्रसंगी पवारांना भेटण्याचे टाळल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती.**

गणेशखिंड रस्त्यावरील 'मोदीबाग' या पवार यांच्या निवासस्थानाबाहेर सोमवारी सकाळी सात वाजल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते जमा होण्यास सुरुवात झाली होती. खासदार वंदना चव्हाण, आमदार रोहित पवार, संदीप क्षीरसागर, प्रवक्ते अंकुश काकडे, शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी महापौर राजलक्ष्मी भोसले, शांतीलाल सुरतवाला, माजी आमदार कमल ढोले-पाटील, विशाल तांबे, काका चव्हाण, माजी नगरसेवक नीलेश मगर, रवींद्र माळवदकर, उदय महाले आदी प्रमुख पदाधिकारी-कार्यकर्ते पवार यांच्या निवासस्थानाबाहेर जमले होते. त्यानंतर सुमारे शंभर ते दीडशे वाहनांच्या ताफ्यात पवार यांच्यासमवेत कार्यकर्ते कराडला गेले होते. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नव्या जोमाने पक्षबांधणीला सुरुवात करणार आहोत. अजित पवारांसोबत गेलेल्या आमदार आणि खासदारांनी आपल्या मनाचा आवाज ऐकला पाहिजे आणि शरद पवारांसोबत राहिले पाहिजे. घडलेली घटना खूपच वाईट आहे. कोणी कोणासोबत राहायचे हा ज्याचा-त्याचा निर्णय आहे. परंतु, आता जे काही आहे ते केवळ शरद पवार यांनी घेतलेल्या कष्टामुळे आहे. याचा विसर पडता कामा नये, अशी प्रतिक्रिया खासदार वंदना चव्हाण यांनी दिली. अजित पवार यांच्यावर प्रेम असले, तरी सध्याच्या परिस्थितीत शरद पवारांना सोडून जाणे, हे कोणत्याच कार्यकर्त्यांना पटणारे नाही.



### आमदारांनी भेट टाळली?

**राष्ट्रवादी काँग्रेसचे पुण्यात दोन आमदार आहेत. वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे अजित पवार यांचे कट्टर समर्थक; तर, हडपसरचे आमदार चेतन तुपे शरद पवार यांचे निकटवर्तीय असल्याचे बोलले जाते. मात्र, या दोन्हीही आमदारांनी शरद पवार गेली दोन दिवस पुण्यात असताना त्यांची भेट घेणे टाळले आहे. त्यामुळे या आमदारांच्या मनात नेमके काय सुरू आहे, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर हे रविवारी सायंकाळी शरद पवार यांच्या भेटीसाठी मोदीबागेत दाखल झाले होते. मात्र, पवार कराड जाण्यापूर्वी स्थानिक नेत्यांनी केलेल्या शक्तिप्रदर्शनात त्यांची अनुपस्थिती हा चर्चेचा विषय ठरली होती. अजित पवार यांच्याकडून स्थानिक नेत्यांना कोणताही आदेश देण्यात आल्याची चर्चा नाही. त्यामुळे अनेक पदाधिकारी आज, मंगळवारी होणाऱ्या बैठकीपासून दूर राहणेच पसंत करतील, अशी अटकळ बांधण्यात येत आहे.**

---

## पुणे भाजपला सतावतेय नवं टेन्शन, स्थानिक नेत्यांना भीती?

। पुणे । महाईन्यूज ।

पुणे: राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली आहे. अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या इतर ८ नेत्यांनी एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून शपथ घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार आणि त्यांच्या समर्थकांचा गट आता आगामी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था भाजपसोबत लढवणार आहे. शपथविधीनंतर आता खाते वाटपाच्या चर्चा सुरु आहेत. त्याचवेळी दुसरीकडे कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्री पद कुणाला मिळणार याच्या चर्चा आहेत. अजित पवार सरकारमध्ये सहभागी होताच, पुणे भाजपला भीती सतावू लागली आहे. अजित पवार यांनी दीर्घकाळ पुण्याचं पालकमंत्रीपद भूषवलं आहे. पुण्याचे पालकमंत्री म्हणून सध्या भाजपचे वरिष्ठ नेते चंद्रकांत पाटील कार्यरत आहेत. २०२२ मध्ये भाजप आणि शिंदेंची सत्ता आल्यानंतर चंद्रकांत पाटील यांच्याकडे हे पद आलं. महाविकास आघाडीची सत्ता असताना पालकमंत्रिपद अजित पवार यांच्याकडे होते. तर, २०१४ ते २०१९ मध्ये दिवंगत भाजप नेते गिरीश बापट यांच्याकडे पालकमंत्री पद होतं.



### पुणे भाजपला सतावतेय भीती

पुण्यातील भाजप नेत्यांमध्ये अजित पवारांचा शपथविधी झाल्यानंतर भीतीचं वातावरण आहे. तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते उत्साही आहेत. अजित पवार हे भाजपसोबत गेल्यानं पुण्याचं पालकमंत्री पद मिळेल, अशी कार्यकर्त्यांना वाटत आहे. दुसरीकडे भाजप नेत्यांना पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरावर वर्चस्व असल्याचं वाटत आहे. पुणे आणि पिंपरीतील काँग्रेस, राष्ट्रवादीचं वर्चस्व कमी केलं होतं. मात्र, जर अजित पवार पालकमंत्री झाले तर ते पुन्हा वर्चस्व मिळवतील, असं भाजप नेत्यांना वाटत आहे. पुणे शहरातील भाजप नेत्यानं नाव न छापण्याच्या अटीवर जर अजित पवार पुण्याचे पालकमंत्री झाले तर भाजप नेत्यांना त्यांच्या भागांमध्ये विकासकामांसाठी निधी मिळवणं अवघड होईल, असं म्हटलं.

# राजकीय परिस्थिती बदलली: पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासकीय बदलांच्या हालचाली!

## दोन बडे अधिकारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीला?

### शिंदे-फडणवीस यांच्या मर्जीतील अधिकाऱ्यांवर टांगती तलवार!

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेत महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात प्रमुख पदावर काम केलेले दोन बडे अधिकारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीला मुंबईत गेले आहेत. त्यामुळे महापालिकेतील प्रशासकीय बदलांची शक्यता आहे, अशी माहिती विश्वासनीय सूत्रांकडून मिळाली.**



शिंदे-फडणवीस सरकारच्या सत्ताकाळात महापालिकेत रुजू झालेल्या अधिकाऱ्यांवर बदलीची टांगती तलवार असून, पिंपरी-चिंचवड महापालिकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे काहीजणांनी फिल्डिंग लावली आहे.

भाजपाच्या सत्ताकाळात महापालिका आयुक्तपदी श्रावण हर्डिकर यांची नियुक्ती झाली होती. त्यांनी भाजपाला अनुकूल भूमिका घेतली. त्यानंतर महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात राजेश पाटील यांची आयुक्तपदी नियुक्ती झाली. पाटील यांनी भाजपाच्या विकासकामांना ‘खो’ घातल्याची टीका झाली. राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर पुन्हा तत्कालीन आयुक्त राजेश पाटील आणि अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांची बदली करण्यात आली आणि त्यांच्याठिकाणी विद्यमान आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. राज्यातील गेल्या दोन दिवसांत प्रचंड मोठी राजकीय उलथापालथ झाली. विरोधी पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील अजित पवार गट भाजपा-शिवसेनेसोबत सत्तेत सहभागी झाला. राजकीय वाटाघाटीनुसार, पुणे जिल्ह्यात महायुतीकडून दोन मंत्रीपदे देण्यात आली. अजित पवार आणि दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे मंत्रीपद मिळाले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील महत्त्वाचे अधिकार अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कारभार आता अजित पवार यांच्या मर्जीनुसार होईल, असे चित्र आहे.

### सरकारच्या माध्यमातून ‘साखरपेरणी’

**दरम्यान, प्रशासकीय वचक निर्माण करण्याच्या दृष्टीने महापालिकेतील प्रशासकीय बदलाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये काम करण्यास इच्छुक असलेले दोन बडे अधिकारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून पुन्हा ‘फिल्डिंग’ लावून आहेत. नवनियुक्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांची संबंधितांनी मुंबईत भेट घेतली असून, नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा व्यक्त दिल्या आहेत. या माध्यमातून ‘त्या’ दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी “शिंदे-फडणवीस-पवार” सरकारच्या माध्यमातून ‘साखरपेरणी’ केली असून, महापालिकेतील एक किंवा दोन अधिकाऱ्यांवर बदलीची वेळ येण्याची दाट शक्यता आहे.**

# अजित पवारांचा निर्णय हा राज्यातील सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी!

## अजितदादामना क्लीन चिट नाही; श्रीकांत भारतीय यांचे प्रतिपादन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवारांनी राज्यातील सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय हा राज्यातील साडेबारा कोटी जनतेच्या हितासाठीच घेतलेला निर्णय आहे. याआधी शिंदे फडणवीस सरकार स्थापन करण्यामागे सर्वसामान्य माणसाचे हित,हेच ध्येय होते.असे प्रतिपादन आमदार श्रीकांत**

पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या वतीने आयोजित वार्तालापाच्या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टीचे महासचिव व विधान परिषदेचे आमदार श्रीकांत भारतीय हे पत्रकारांशी बोलत होते,यावेळी पिंपरी चिंचवड प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे,नगर सदस्य मोरेश्वर शेडगे,राजू दुर्गे,राजेश पिल्ले,क्षितिज गायकवाड आदी उपस्थित होते.राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीबद्दल बोलताना श्रीकांत भारतीय म्हणाले की, घेतलेला निर्णय हा सामान्य माणसाच्या हिताचा अजेंडा असेल तर,तो निर्णय जनता नक्कीच स्वीकारते.अजित पवार राज्यातील सत्तेत सामील होत असताना.सामान्य जनतेच्या हितासाठी म्हणून त्यांनी हा निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर नरेंद्र मोदी हेच देशाचे पुन्हा पंतप्रधान झाले पाहिजे,असे दुसऱ्या एखाद्या पक्षाला वाटावे हे खूप महत्त्वाचे ठरते.

२०१४ ते २०१९ च्या सरकारने केलेल्या कामगिरीवर निवडणुकीत जनतेने कौल दिला होता.२०१९ ला सत्तेत आलेले सरकार हे न्याय तत्वाचे सरकार नव्हते,त्यामुळे जनतेच्या मनातील सरकार यावे यासाठी प्रयत्न झाले व तसेच सरकार सत्तेत आले आहे. श्रीकांत भारतीय एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले की, "आम्ही कोणताही पक्ष फोडलेला नाही,तेच इकडे आले आहेत". अजित पवारांच्या सिंचन घोटाळा बाबतच्या आरोपाबाबत बोलताना श्रीकांत भारतीय म्हणाले की, मुळात अजित पवार भारतीय जनता पार्टीत आले नाहीत, तर त्यांचा पक्ष सरकार मध्ये सहभागी झाला आहे.सिंचन घोटाळ्यातून कोणताही क्लीन चीट



### दर महिन्याला पत्रकार संघ देणार पुरस्कार

**पिंपरी चिंचवड पत्रकार संघाने यावेळी चांगली कामगिरी बजावणाऱ्या अधिकाऱ्यांना लोकहितवादी पुरस्कार देऊन आमदार श्रीकांत भारतीय यांच्या हस्ते गौरविले. एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशनचे पोलीस (निरीक्षक) राजेंद्र निकाळजे व पुणे महानगरपालिकेचे कर्मचारी व साहित्यिक वि.रा.मिश्रा यांचा यावेळी गौरव करण्यात आला.या कार्यक्रमात बोलताना श्रीकांत भारतीय म्हणाले की,दर महिन्याला असा पुरस्कार पत्रकार संघ देणार हे कौतुकास्पद आहे. पत्रकार संघाचा लोकांच्या चांगुलपणावर विश्वास आहे. हे यातून सिद्ध होते.**

# पिंपरीतील जीकेएन बहुराष्ट्रीय कंपनीतील कामगार संपावर जाणार

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड शहरातील नामांकित जी. के. एन. (महिंद्रा सिंटर्ड) या बहुराष्ट्रीय कंपनीतील कामगारांनी १३ जुलै पासून कंपनी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराविरुद्ध संप करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या कंपनीत महिंद्रा सिंटर्ड कामगार संघटना दिवंगत कामगार नेते कॉम्रेड दादा रुपमय चॅटर्जी यांनी स्थापन केली आहे. मागील काही वर्षांपासून व्यवस्थापन कामगारांची पिळवणूक करीत आहे त्यामुळे संघटनेचे अध्यक्ष सदानंद टिळेकर आणि जनरल सेक्रेटरी निळकंठ मिरजगावे यांनी कामगार संपावर जाणार असल्याचे पत्र प्रसिद्धिस दिले आहे. पिंपरी चिंचवड आणि भोसरी औद्योगिक पट्ट्यात सुरुवातीच्या काळात ज्या बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या, त्यामध्ये महिंद्रा सिंटर्ड या कंपनीचा समावेश आहे. अलीकडच्या काळात महिंद्रा सिंटर्ड कंपनीचे नाव बदलून जी. के. एन. करण्यात आले. या कंपनीत टीयूसीसी



या कामगार संघटनेशी संलग्न महिंद्रा सिंटर्ड कामगार संघटना कार्यरत आहे. या बहुराष्ट्रीय कंपनीत मागील काही वर्षांपासून व्यवस्थापन कामगारांची पिळवणूक करीत आहे. याविषयी कामगार संघटनेने कामगार आयुक्त मुंबई, कामगार उपायुक्त पुणे आणि पिंपरी पोलीस स्टेशन यांना देखील पत्र दिले आहेत. कामगार संघटनेच्या या मागणीकडे कंपनी व्यवस्थापन दुर्लक्ष करीत आहे. महिंद्रा सिंटर्ड कामगार संघटनेच्या वतीने प्रसिद्धिस देण्यात आलेल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, जी. के. एन. पिंपरी, ही एक बहुराष्ट्रीय कंपनी असून मागील काही वर्षांपासून व्यवस्थापन करीत असलेल्या विविध पिळवणुकीला कंटाळून जी. के. एन. पिंपरी प्लांटचे सर्व कामगार ही दि. १३ जुलै २०२३ पासून संपावर जाणार आहेत.

# तत्वांची पुंगळी होते; याची सत्यता पटली



भूमिका

निलेश दुटाळ
+91-87668 40811

**अलीकडे महाराष्ट्रात तत्वनिष्ठ राजकारणाने गणपतराव देशमुख यांच्या सोबतच शेवटचा श्वास घेतल्याची आता सर्वांना खात्री पटली आहे. सत्तेसाठी विविध दिशांना असणारी तोंडे कशी एकाच दिशेने येतात याचा प्रत्यय रविवारी महाराष्ट्राला आला. ज्याने सत्ताधारी पक्षाच्या चुकांवर अंकुश ठेवत कारभार योग्य पद्धतीने चालावा यासाठी पदाचा वापर करावा त्याच विरोधी पक्षनेत्याने चक्क सत्ताधारी पक्षात सामील व्हावे असे राज्यात चौथ्यांदा घडले आहे. राणे,विखे पाटील,शिंदे यांच्यानंतर आता अजित पवार हे त्या रांगेत येऊन बसले आहेत.**

स्वतःच्या पक्षात अजित पवारांची कोणती घुसमट होती हा स्वतंत्र विषय असला तरी या कोलांटउडीने त्यांचे अंतिम ध्येय सत्ता होते हे या निमित्याने उघडे पडले आहे. जे छगन भुजबळ उठता बसता फुले,शाहू,आंबेडकरांच्या नावाची जपमाळ ओढत असतात त्यांचेही एका रात्रीत भाजपच्या सरकार मध्ये सामील होणे हे मोठे नवल आहे. आपल्या कर्तृत्व कापडांचे गाठोडे घेऊन हे नेते शेवटी भाजपच्या " वाशिंग मशीन " पुढे रांगेत उभे झाले आहेत.

अजित पवार आणि हे सगळेच नेते संवेदनशील आहेत असा लोकांचा समज होता. रविवारी बुलडाण्यात ज्या भीषण अपघातात २५ लोक बळी गेले त्यांच्या चिंता जळत होत्या त्याच वेळी मुंबईत हे लोक मंत्रिपदाच्या शपथा घेत एकमेकांना पेढे भरवीत होते. चार दिवस हे पुढे ढकलले असते तर आकाश कोसळले नसते मात्र ही बेशरमेची हद्द झाली. तुम्ही ज्यांच्या बळावर राजकीय उद्या मारता टी जनता मरत असताना त्याचेही जर काहीही वाटत नसेल तर यापुढे जनतेच्या ताटात काय वाढून ठेवले आहे हे दिसून आले आहे. सामान्य जनता आणि त्यांच्या वेदना गेल्या



उडत ,आम्हाला सत्ता आणि राजकारण यापलीकडे काहीही दिसत नाही हे या नेत्यांनी दाखवून दिले आहे ,किमान अजित पवार याला अपवाद ठरतील ही एकमेव अशाही फोल ठरली आहे. २५ निरपराध लोकांचा आगीत कोळसा झाल्याच्या वृत्ताची शाई वाळण्याच्या आधीच ज्यांना आपले हसरे अन मग्रूर चेहरे लोकांना दाखविण्याची घाई झालेली होती हे लोकांना कळले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात अजित पवार यांनी जी खदखद व्यक्त केली त्यातून त्यांचे पक्षावर किती प्रेम आहे हे दिसले. त्यांना संघटन वाढवायचे आहे आणि पक्षाची आगामी काळात एकहाती सत्ता आणायची आहे याचा निर्धार दिसला , या कार्यात शरद पवार त्यांना बांधून ठेवतात की काय असा आभास निर्माण झाला होता. त्यांच्या रविवारच्या खेळीने मात्र शरद पवार यांचे त्यांच्याबाबत धोरण कसे योग्य होते याचा अनुभव राज्याला आला. शरद पवार माणसे आणि आगामी काळात घडणाऱ्या घटना ओळखण्यात प्रसिद्ध आहेत त्यामुळेच अजित पवारांचे बंड त्यांना मोठा झटका देण्यात कमी पडले. एक वर्षापासून अजित पवार आणि भाजपची वाढणारी जवळीक कदाचित काकांना माहित असावी ,म्हणून त्यांनी बांधबंदिस्ती करून ठेवली होती याचे आता आकलन होते. कालच्या पत्रकार परिषदेत चेहऱ्यावर कोणताही तणाव येऊ न देता त्यांनी पुन्हा पायाला भिंगरी लावून घेतली यावरून त्यांची दूरदृष्टी अधोरेखित झाली.

आधी शिवसेना फुटल्यावर आता राष्ट्रवादी फुटली आहे , पुन्हा काहीकाळ विधिमंडळात कोणाचा पक्ष खरा याचे प्रयोग काही काळ चालतील आणि शेवटी अजित पवार आणि त्यांच्या सहकार्यांना स्वतःची नवी व्यवस्था निर्माण करून लोकांच्या दारात कौल मागण्यासाठी जावे लागेल. मतदार आणि सामान्य माणूस अतिशय चोखंदळ असतो हे अनेकदा सिद्ध झाले आहे. लोकांना असे जादूचे प्रयोग सहन होत नाहीत. तत्वांची पायमल्ली करणे किंवा असे भ्रष्ट राजकारण त्यांच्या लक्षात येत नाही म्हणून लोक गर्वाने फुगलेल्या छातीवर मतांची टाचणी लावतात आणि अनेकांना ताळ्यावर आणतात हे आजवर आपण अनुभवले आहे. त्यासाठी घोडा मैदान दूर नाही. चिन्ह,पक्ष कोणाला आणि खरा नेता कोण ? याचा निकाल मतदार लावणार आहेतच तोवर कुणीही खटपटी करून घ्यायला हरकत नाही. जुनी खोडे पडल्याशिवाय नवी पालवी फुटत नसते हे दिसून येईल.

राजकारणात तत्व किंवा चांगुलपणा हा केवळ सुभाषित म्हणून वापरायचा असतो त्याला प्रत्यक्ष जीवनात अमलात आणायचे नसते हे या निमित्याने खरे ठरले आहे. सत्ता आणि त्यातून अमाप पैसा या ध्येयाला सध्या कुणीही नाकारू शकत नाही ,करणी आणि कथनी यांच्यात सुरक्षित अंतर ठेवून ज्यांचे राजकारण चालत असते त्या लोकांनी तत्वांची पिळदार पुंगळी केली आहे. प्रीती संगमवरून पवारांचा जनसंपर्क आता सुरु झाला आहे , त्याचे आता जनसागरात कसे रूपांतर होते यावरच यापुढे राजकारण अवलंबून आहे आणि पवार होत्याचे नव्हते करण्यात प्रवीण आहेत यावर विश्वास ठेवला तर हे बंड कसे औटघटकेचे आहे याचाही अनुभव लवकरच महाराष्ट्राला येईल याची खात्री वाटते. राज्यात यापुढे मात्र मोठी चुरस वाढली आहे त्यातून असंख्य नव्या तरुणांना संधी मिळेल , त्यांच्यासाठी ही आपत्ती इष्ट ठरणार आहे हे नक्की.

## संपादकीय »

### जपून... अहंकाराचा 'धोका' आहे

***प्रेमात केवळ अधिकार नाही, तर जबाबदारी आणि प्रसंगी परिस्थितीनुरूप परस्परांना समजून घेत, वेळ आल्यास समोरच्या व्यक्तीचा विचार करून मागे सरण्याची किंवा त्यागाचीही तयारी ठेवावी लागते, हा विचार वा चर्चा कधीच होताना दिसत नाही. हा जितका संस्कारांचा भाग समजला जातो, तितकाच तो सामाजिक स्तर आणि जडणघडणीतलाही आहे.***

गेल्या काही वर्षांत प्रेमभावनेतून एकत्र आलेल्यांमध्ये शारीरिक हिंसेने पातळी ओलांडल्याचे चित्र दिसून येते आहे. मग ती श्रद्धा असो, दिल्लीत बळी गेलेली साक्षी असो, ठाण्यात 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये प्रेयसीचे तुकडे करून कुकरमध्ये शिजवण्याची घटना असो, बिहारमध्ये प्रेयसीने प्रियकराचे गुप्तांग कापण्याची घटना असो किंवा अलीकडेच पुण्यात सलग घडलेल्या दोन घटना, पहिली राज्य सेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या दर्शनाचा खून आणि दुसरी, भर दिवसा तरुणीवर कोयत्याने झालेला हल्ला. या सगळ्यांत प्रेम मोठे, की अहंकार या प्रश्नाचे उत्तर अर्थातच 'अहंकार' असेच मिळते.

**प्रकाश प्रदूषणामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असतो. याचा परिमाण अप्रत्यक्षपणे मानवावर होत असला, तरी पक्षी, काही प्राणी आणि कीटक यांचे मोठे नुकसान होते. जल आणि हवा प्रदूषणानंतर प्रकाश प्रदूषणामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असतो.**

## टाळण्याजोगे संकट!

याचा परिमाण अप्रत्यक्षपणे मानवावर होत असला, तरी पक्षी, काही प्राणी आणि कीटक यांचे मोठे नुकसान होते. यात मुख्यत्वे पाकोळ्या, म्हणजे फुलपाखरासारखे, पण मळकट रंगाचे निशाचर कीटक मोठ्या संख्येत मरण पावतात.

बरेच कीटक प्रकाशाच्या स्रोताभोवती एकत्रित होऊन फिरतात आणि शेवटी थकून मारतात. काही वेळेला कृत्रिम प्रकाशामुळे असे कीटक पाली, बेडूक अशा प्राण्यांना स्पष्ट दिसू शकतात व त्यांच्या शिकारीला सहज बळी पडतात. पतंगांकडे वटवाघळांपासून स्वतःला वाचवण्याची एक प्रणालीदेखील असते. परंतु कृत्रिम प्रकाशामुळे ही प्रणाली बिघडते व हे कीटक वटवाघळांचे भक्ष्य होतात. जे कीटक यातून बचावतात, त्यांना अन्न व जोडीदार शोधणे, प्रजनन या क्रियांमध्ये अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. हे कीटक रात्रीच्या मंद प्रकाशात वनस्पती व फुलांपासून अन्न शोधतात. अति जास्त कृत्रिम प्रकाश त्यांना भारावून टाकतो व ते अन्न मिळवू शकत नाहीत.

या सगळ्यामुळे अन्नसाखळी विस्कळीत होतच आहेच, पण त्याशिवाय परागीभवन करणाऱ्या या कीटकांची संख्या झपाट्याने कमी होत चालली आहे. नैसर्गिक परागीभवन कमी झाले, तर आपल्याला फळे व भाज्या पुरेशा प्रमाणात मिळणार नाही.



या समस्येला आळा घालण्यासाठी काही विकल्प आहेत. असे दिसून आले आहे की, हे कीटक कमी तरंग लांबीच्या प्रकाशाकडे जास्त आकर्षित होतात. त्यामुळे, अधिक तरंगलांबीच्या प्रकाशाचे स्रोत वापरल्यास पाकोळीसारख्या कीटकांचे नुकसान टळेल. तसेच एलईडी दिवे न वापरता सोडियम व्हेपर किंवा पिवळ्या रंगाचे दिवे वापरल्यास कीटक आकर्षित होत नाहीत. याचबरोबर रात्रीच्या वेळी दिव्यांचे प्रकाशित क्षेत्र मर्यादित ठेवण्यानेही दिव्यांजवळ येणाऱ्या कीटकांचे प्रमाण कमी होऊ शकते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## रोहित पवारच आता राष्ट्रवादीचा आश्वासक चेहरा?

# पुतण्याचे वार, नातू झाला ढाल!

## » राष्ट्रवादीच्या पडझडीतून रोहित पवार घेणार फिनिक्स भरारी?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित दादांच्या बंडानंतर रोहित पवारांनी हे ट्वीट केलं अन् आपले मनसुबे स्पष्ट केले. सख्ख्या पुतण्यासह विश्वासू सहकाऱ्यांनी शरद पवारांची साथ सोडली असताना शरद पवार या आश्वासक चेहऱ्याची साथ रोहित पवारांनी बंडानंतर क्षणभरासाठीही सोडली नाही. पत्रकार परिषद असो, साताऱ्याचा दौरा किंवा मग शरद पवारांच्या कारमध्ये फ्रंटसीवर बसून मुंबईत येणं असो, शरद पवारांसोबत रोहित पवार सावली सारखे उभे राहिले. अजित पवारांच्या बंडानंतर रोहित पवार यांची प्रतिमा झळाळून निघाली, खंबीरपणे ताकद देणारे रोहित पवार यांनाच आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आश्वासक नेतृत्व म्हणून आपली जागा निर्माण करण्याची संधी चालून आलीये. रोहित पवारांना शरद पवारांकडून कशी ताकद मिळू शकते, रोहित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचं आश्वासक नेतृत्व कसे ठरु शकतात याचा विश्लेषण...**



पक्षात फूट पडल्यानंतर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी कऱ्हाडच्या प्रीतिसंगमावरील यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन नव्या संघर्षाचा एल्गार केला. वयाच्या ८३ व्या वर्षीही संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढत पक्ष उभारण्याची उमेद त्यांच्या देहबोलीतून दिसत होती. यावेळी त्यांच्यासोबत असणाऱ्या नातू रोहित पवार यांनी सर्वांचं लक्ष वेधलं. काकांनी बंड केलं तरी आजोबांची साथ सोडणार नसल्याचं रोहित पवारांनी सांगितलं. शरद पवार यांच्या पावलावर पाऊल ठेवून रोहित पवार राजकारण करीत असल्याचे मानले जाते.

रोहित पवार यांची तुलना कायमच अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांच्याशी केली जाते. मात्र रोहित पवार हे कायम वरचढ ठरताना दिसत आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांनी त्यांचा मुलगा पार्थ पवार यांना शरद पवार यांच्या लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली होती, पण त्यांना विजय मिळवता आला नाही. निवडणुकीत पराभूत होणारा पार्थ हा पवार कुटुंबातील पहिलाच सदस्य ठरले, त्यानंतर पार्थ पवार राजकारणात फारसे सक्रिय झालेच नाहीत.

त्यानंतरच रोहित पवार विधानसभेच्या निवडणुकीत उतरले आणि विजयी होऊन त्यांनी पवार कुटुंबाचा वारसा पुढे नेला. अजित पवारांनी बंडखोरी भूमिका घेतली असताना आजोबांचा राजकीय पाठींबा म्हणून रोहित पुढे आले आहेत. त्यांनाही शरद पवार यांच्याकडून अनेक पदे मिळाली. भविष्यात रोहित पवार यांना आणखी नव्या जबाबदाऱ्या दिल्या जाण्याचे संकेत आहेत.

अजित पवारांच्या बंडानंतर शरद पवारांवर होणारे वार रोहित पवार निधड्या छातीनं ढाल म्हणून झेलतायत. आगामी काळात पक्षात अजित दादांसारखंच वजन रोहित पवारांनी निर्माण केलं तर त्यात नवलं वाटायला नको.

### रोहित पवारांची कारकिर्द

- »रोहित पवार हे शरद पवार यांचे जेष्ठ बंधू आप्पासाहेब पवार यांचे नातू
- »बारामती ॲग्रो कंपनीची धुरा सांभाळली
- »जिल्हा परिषदेपासून राजकारणाची सुरुवात
- » २०१७ मध्ये शिर्सुफळ गुणवडी जिल्हा परिषद सदस्य
- »२०१९ मध्ये रोहित पवार कर्जत-जामखेडचे आमदार
- »भाजपचे मंत्री राम शिंदे यांना अस्मान दाखवंल
- »२०२२ मध्ये महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष
- »अजित पवारांच्या बंडानंतर शरद पवार यांना साथ

### राष्ट्रवादीचा आश्वासक चेहरा?

- > संघर्षकाळात पवारांची साथ दिल्यानं पवार समर्थकांमध्ये आश्वासक नेतृत्व म्हणून प्रतिमा
- > अनेक दिग्गज नेते अजित पवारांसोबत गेल्यानं पक्षात संघटनात्मक जबाबदारी
- > पक्षातील निर्णय प्रक्रियेत प्रभाव
- > विधानसभेत पक्ष नेतृत्वाची संधी
- >निवडणुकीच्या राजकारणात वावर वाढेल
- > पक्षाचा राज्यातील नवा चेहरा म्हणून उभारी
- > राज्याच्या राजकारणात नव्या नेत्याचा उदय

---

## मुंबई ठाण्यासह राज्यात विविध जिल्ह्यात अतिमुसळधार!

।मुंबई।

गुजरात आणि आजूबाजूच्या परिसरावर असलेली चक्रीय वातस्थिती, पूर्व-पश्चिम वाऱ्याचे क्षेत्र, गुजरात ते केरळ किनारपट्टीवर असलेली ढगांची द्रोणीय स्थिती यामुळे कोकणातील पावसाला चालना मिळत असून, आज, बुधवारसाठी मुंबई आणि ठाण्यामध्ये ऑरेंज ॲलर्ट देण्यात आलेला आहे. सध्या पश्चिमेकडून येणारे वारेही तीव्र असून त्यामुळेही पाऊस पडण्याची शक्यता आहे. मंगळवारी दिवसा मध्य मुंबईमध्ये पडलेल्या पावसाने ७० ते १०० मिमीचा टप्पा गाठला. पावसाचा जोर मंगळवारी मध्य मुंबईमध्ये काहीसा अधिक होता. कुलाबा येथे मात्र सकाळी ८.३० ते सायं. ५.३० या कालावधीत १८ मिलीमीटर तर सांताक्रूझ येथे केवळ ९ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला. दक्षिण मुंबई आणि मुंबई उपनगरांमध्ये दिवसभरात पावसाचे प्रमाण अधिक नव्हते.

मुंबई, ठाण्यामध्ये काही ठिकाणी आज, बुधवारी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. तसेच रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गामध्ये तुरळक ठिकाणी अतितीव्र मुसळधार स्वरूपाच्या पावसाचाही अंदाज आहे. पूर्व-पश्चिम वाऱ्याची प्रणाली सिंधुदुर्गाजवळ असून, ती अधिक सक्रिय झाल्यास पावसाचा जोर वाढू शकतो. सह्याद्रीला धडकून कोकणामध्ये पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने प्रादेशिक हवामान विभागाने ऑरेंज ॲलर्ट जारी केला आहे.

## लेकीसाठी शरद पवारांनी राष्ट्रवादी फोडली

### »धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांची बोचरी टीका

। धुळे ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई आग्रा महामार्गावर पळासनेरजवळ झालेल्या भीषण अपघातात जखमी झालेल्या रुग्णांची पाहणी करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन हे आज आले होते. यावेळी त्यांनी भाऊसाहेब हिरे शासकीय रुग्णालय तसेच धुळे शहरातील सिद्धेश्वर हॉस्पिटल या ठिकाणी जखमी रुग्णांची पाहणी केली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते..**

मंत्री गिरीश महाजन यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. ज्या पक्षाचे जास्त आमदार त्याचाच पक्ष असतो. शिवसेनेत काय झालं. राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या फुटीनंतर निर्माण झालेल्या दोन गटात आता अजित पवार यांचीच राष्ट्रवादी आहे. सध्या तरी अजित पवार यांचाच पारडं जड असल्याचं मंत्री गिरीश महाजन म्हणाले.

जसं शिवसेनेमध्ये झालं तसंच राष्ट्रवादीमध्येही झाल्याचं म्हणत महाजन यांनी या दोन्ही पक्षांतील घराणेशाहीतील वादाला लोक कंटाळले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची खरी धुरा ही अजित पवार यांच्याकडेच द्यायला हवी होती. परंतु शरद पवार हे सध्या मुलीच्या प्रेमात पडले. त्यांना मुलीचा मोह झाला. त्यामुळे आणि सर्वच जबाबदाऱ्या या सुप्रिया ताईंनाच देण्यात आल्याने त्यांचे उजवे डावे हातही नाराज झाल्याने हे बंड झाले आहे. आणि या बंडाचे खापर महाजन यांनी शरद पवारांवर फोडले आहे.




पहाटेच्या शपथविधीवरून आताचा शपथविधी हा सक्सेस होईल का? असा प्रश्न महाजन यांना विचारण्यात आला. पहाटेच्या शपथविधी दरम्यान त्यावेळी थोडी ठोकर खाल्ली होती. अजितदादांनीही त्यावेळी प्रयत्न केला होता. परंतु त्यावेळी त्यांच्यासोबत आलेले ७ जणही टिकले नाहीत. आता ४० हून अधिक आमदार अजित पवारांसोबत आहेत. आणि आता अजितदादांनी पूर्ण तयारी ही जपून केली आहे. तसेच अताची परिस्थिती बदलली आहे. आताचा शपथविधी फसणार नाही, असा विश्वास गिरीश महाजन यांनी केला आहे.

# केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराचे वेध!

## » फडणवीसांच्या प्रमोशनची चर्चा: पटेलांना लॉटरी? शिंदे कुणाला संधी देणार?

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संपूर्ण मंत्रिमंडळाची पाच तास मॅरेथॉन बैठक मंगळवारी घेतल्यानंतर लोकसभा निवडणुकीपूर्वीच्या बहुधा अखेरच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या प्रस्तावित फेरबदलाची जोरदार चर्चा आहे. येत्या ९ ते १२ जुलै दरम्यान कधीही विस्तार होऊ शकतो आणि त्यात काही बड्या मंत्र्यांना डच्चू मिळू शकतो, असे सूत्रांनी सांगितले.**



ज्या राज्यांत निवडणुका असतात तेथील चेहऱ्यांना झुकते माप देण्याची परंपरा पंतप्रधान पाळणार अशी चिन्हे आहेत. तेलंगण, मध्य प्रदेश व छत्तीसगडमधील अनेक नवीन चेहरे ‘टीम मोदी’मध्ये दिसू शकतात. महाराष्ट्रातील काही राज्यमंत्र्यांना लागलेल्या मंत्रिपदाच्या लॉटरीची मुदत संपत आल्याचेही संकेत आहेत. सध्या मोदी सरकारमध्ये ७५ मंत्री आहेत. विस्तारानंतर मोदींसह एकूण ८१ मंत्री होऊ शकतात.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ७ जुलैपर्यंत दिल्लीत नसतील. पंतप्रधान मोदी ७ व ८ जुलैला दिल्लीबाहेर आहेत. यानंतर पंतप्रधान १३ जुलैला फ्रान्सला जाणार आहेत. तेथून ते परतल्यावर लगेचच संसद अधिवेशन सुरू होईल. म्हणजेच ९ ते १२ जुलै या तीन दिवसांतच मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकतो.

उत्तर प्रदेशातील महेंद्रनाथ पांडे, अजय मिश्रा टेनी यांच्यासह चार मंत्र्यांची खुर्ची धोक्यात आली आहे. गुजरातचे पुरुषोत्तम रुपाला, दर्शना जरदोश, तेलंगणचे जी. किशन रेड्डी यांचे स्थान धोक्यात आहे. बिहारमधून लोकजनशक्ती पक्षाचे (आर) चिराग पासवान, पंजाबमधून अकाली दलाच्या माजी मंत्री हरसिम्रत कौर बादल यांना मंत्रिपद मिळू शकते.

»उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दिल्लीला बदली होणार असल्याची कुजबुज पुन्हा सुरू करण्यात आली आहे. मात्र, भाजप सूत्रांच्या माहितीनुसार, पंतप्रधान सन २०२४च्या निवडणुकीपूर्वी फडणवीस यांचा एकखांबी तंबू

### महाराष्ट्रातून वर्णी

शिंदे गटाकडून राहुल शेवाळे, प्रतापराव जाधव व भावना गवळी यांची नावे चर्चेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते प्रफुल पटेल यांचेही नाव चर्चेत आहे.

### यांची खुर्ची धोक्यात

- रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, छत्रपती संभाजीनगरमधून लोकसभा निवडणूक लढविण्याचीची तयारी करणारे भागवत कराड, कपिल पाटील आदींची खुर्ची धोक्यात असल्याचे समजते.

---

## शरद पवार यांचा वरदहस्त असेपर्यंत मीच प्रदेशाध्यक्ष; जयंत पाटलांचं अजित पवारांना प्रत्युत्तर

।मुंबई।

'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आमचा आहे आणि आता अलीकडे झालीय ती 'नोशनल पार्टी' आहे', असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मंगळवारी लगावला. 'त्या पक्षाने मला निलंबित केले काय किंवा ठेवले काय मी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष आहे. ते मला बाजूला हो म्हणत नाही. तोपर्यंत बाजूला करण्याचा कुणाला अधिकार नाही', असे पाटील यांनी स्पष्ट केले.



'शरद पवार आमच्यासोबत आहेत आणि आम्ही राष्ट्रवादीचेच आहोत, असे सांगून लोकांना संभ्रमात टाकण्याचा प्रयत्न होत असेल तर त्यावर मला काही बोलायचे नाही. पवार यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. ती महाराष्ट्राला समजली आहे. राष्ट्रवादीचे ५३ आमदार आमच्याकडे आहेत. त्यापैकी नऊ जणांवर आम्ही कारवाई केली आहे. त्यामुळे ५३ वजा नऊ याचा अर्थ ४४ आमदार माझ्या राष्ट्रवादीचे आहेत. त्यांना वेगळ्या गटात टाकू नये, त्यांना वेगळी प्रलोभने दाखवू नये, त्यांच्यावर दबाव टाकू नये, सगळ्यांना शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करू द्यावे' असे आवाहन पाटील यांनी केले. 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदारांमध्ये मोठी नाराजी आहे. उद्धव ठाकरे यांची शिवसेना ज्या कारणांनी सोडली तीच कारणे परत आमच्या पुढ्यात आणून ठेवत आहेत. त्यामुळे असंतोष हळूहळू पुढे येईल. थोड्याच दिवसांत नाशिक, बीड, अहमदनगर, सोलापूर व इतर काही जिल्ह्यांत शरद पवार स्वतः दौरा करणार आहेत. दिल्लीत कार्यकारी समितीची बैठक झाल्यानंतर हा दौरा सुरू होईल. पाऊस असो अथवा नसो पवार बाहेर पडणार आहेत. साताऱ्याच्या दौऱ्यावर जसे स्वागत झाले त्याचपद्धतीने राज्यातील जनता, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते त्यांचे स्वागत करतील', असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# शरद पवारांची पहिली मोहीम ठरली

## » भुजबळांसह त्या आमदारांची कोंडी करणार, असा असणार

।नाशिक ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई आग्रा महामार्गावर पळासनेरजवळ झालेल्या भीषण अपघातात जखमी झालेल्या रुग्णांची पाहणी करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन हे आज आले होते. यावेळी त्यांनी भाऊसाहेब हिरे शासकीय रुग्णालय तसेच धुळे शहरातील सिद्धेश्वर हॉस्पिटल या ठिकाणी जखमी रुग्णांची पाहणी केली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते..**

: विश्वासू सहकारी छगन भुजबळ यांनीही अजित पवार यांना बंडात दिलेली साथ राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या चांगलीच जिव्हारी लागली आहे. त्यामुळे अजित पवारांसह बंडखोरांना धडा शिकवण्यासाठी शरद पवार राज्याचा दौरा करणार असून, त्याची सुरुवात ते छगन भुजबळांचा बालेकिल्ला असलेल्या नाशिकपासून करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीच याबाबतची घोषणा केली आहे. येवल्यासह सहा बंडखोरांच्या मतदारसंघामध्ये सभा घेऊन त्यांची कोंडी करण्याची तयारी पवारांनी केली आहे.

अजित पवार यांनी रविवारी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या विरोधात बंड करून स्वत:सह नऊ जणांच्या पदरात मंत्रिपद पाडून घेतले. अजित पवार यांच्या या कृतीमुळे राज्याच्या राजकारणाची दिशाच बदलली असून, शरद पवार यांचे विश्वासू असलेल्या छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील आणि प्रफुल्ल पटेल यांचाही त्यात समावेश आहे. त्यामुळे शरद पवार यांच्याकडून आमदारांवर कारवाई केली जात आहे. पवारांनी या सर्वांची हकालपट्टी करतानाच, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. याविरोधात जनतेच्या न्यायालयातही जाण्याचा निर्णय घेतला आहे. अजित पवारांपेक्षा भुजबळांची बंडखोरी पवारांना चांगलीच जिव्हारी लागली आहे. तिकडे जाऊन माहिती कळवतो असे सांगून गेलेल्या भुजबळांनी थेट मंत्रिपदाची शपथ घेतल्याचा खुलासा खुद्द पवार यांनीच केला आहे. त्यामुळे या सर्वांचा बंदोबस्त करण्याचा विडा पवारांनी उचलला असून, या दिग्गजांच्या मतदारसंघांमध्ये जाऊन सभांचा धडाका लावणार आहेत. त्याची सुरुवात पवार भुजबळांचा ‘होल्ड’ असलेल्या नाशिकमधून करणार आहेत. नाशिक,



### धडा शिकवण्याचा निर्धार

»नाशिकमध्ये राष्ट्रवादीचे सहा आमदार निवडून आले असून, त्यात भुजबळ येवल्यातून, सरोज अहिरे देवळाली, ॲड. माणिकराव कोकाटे सिन्नर, दिलीप बनकर निफाड, नरहरी झिरवाळ दिंडोरीतून तर नितीन पवार हे कळवणमधून निवडून आले आहेत. हा सगळा पट्टा शरद पवार यांना मानणारा आहे. त्यामुळे सर्वाधिक सहा आमदार असून एकही आमदार सध्या शरद पवारांसोबत नाही. त्यामुळे पवारांनी आता या सर्वांना धडा शिकवण्याचा निर्णय घेतला असून, या सहा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादीची दुसरी फळी उभी केली जाणार आहे. त्यामुळे भुजबळच नव्हे तर, या पाचही आमदारांची कोंडी करण्याचा प्रयत्न आगामी काळात होणार आहे.

नागपूर, सोलापूर आदींसह महत्त्वाच्या जिल्ह्यांचा दौरा शरद पवार करणार असल्याचे म्हणाले आहेत. शरद पवार हे दौऱ्याची सुरुवात नाशिकपासून करणार असल्याचे जयंत पाटील म्हणाले असून, नाशिकसह येवल्यातही ते जाणार आहे. ग्रामीण भागात शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे भुजबळांसह जिल्ह्यातील आमदारांचीही ते कोंडी करणार आहेत.

राज्यातील जनता शरद पवारांच्या पाठिशी असून, ते स्वत: जनतेत जाऊन संवाद साधणार आहेत. त्याची सुरुवात ते नाशिकमधून करणार आहेत.

# शाहरुखच्या चित्रपटात प्रियांका चहर चौधरी! डंकीमध्ये दिसणार?



सुपरस्टार सलमान खानच्या प्रसिद्ध टीव्ही शो बिग बॉसनंतर स्पर्धकांचे नशीब चमकताना दिसते आहे. याचे थेट उदाहरण बिग बॉस 13 ची स्पर्धक असलेली अभिनेत्री शहनाज गिलचे नाव घेता येईल. अशा परिस्थितीत बिग बॉस सीझन 16 ची स्पर्धक प्रियांका चहर चौधरी बद्दल मोठी बातमी समोर येत आहे. ज्यामध्ये असे सांगितले जात आहे की प्रियांका चाहर चौधरी या वर्षी सुपरस्टार शाहरुख खानच्या आगामी 'डंकी' चित्रपटात एंट्री करू शकते.
बॉलीवूड लाईफच्या बातमीत सांगण्यात आले आहे की, बिग बॉस 16 ची स्पर्धक प्रियांका चहर चौधरी शाहरुख खानच्या आगामी 'डंकी' चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे.
'डंकी' चित्रपटाचे दिग्दर्शक राजकुमार हिरानी या चित्रपटासाठी पंजाबी मुलीच्या शोधात असल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे. याआधी सलमान खानने बिग बॉस 16 शोमध्ये सांगितले होते की, त्याच्याकडे प्रियांकासाठी खूप काही आहे.
अशा परिस्थितीत आता सलमानच्या सूचनेवरून प्रियंका चहर चौधरीला शाहरुख खानच्या 'डंकी' चित्रपटात महत्त्वाची भूमिका मिळू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीत प्रियांका चाहर चौधरी 'डंकी' चित्रपटात दिसण्याची शक्यता असल्याची चर्चा सोशल मीडियावर जोर धरू लागली आहे.



# देशाच्या पहिल्या ट्रांसजेंडर ब्युटी क्वीनची कथा!

प्रत्येक आई आपल्या मुलावर खूप प्रेम करते. भारताच्या अशाच एका आईने आपल्या मुलाची खूप काळजी घेतली, त्याला सांभाळलं, त्याचा प्रत्येक हट्ट पुरवला पण जेव्हा तो मुलगा एक ट्रांसजेंडर असं कळलं तेव्हा त्याला घराबाहेर हाकलून दिलं.तेव्हा तो मुलगा अवघ्या १० वर्षांचा होता. या मुलामध्ये काळानुरूप बदल घडू लागले, ही कहाणी आहे देशातल्या पहिल्या ट्रान्सजेंडर इंटरनॅशनल ब्युटी क्वीन जिंकणाऱ्या नाज जोशीची. जीने भारताचे नाव जगभर गाजवले.

नाज जोशीने आतापर्यंत 8 सौंदर्य स्पर्धा जिंकल्या आहेत. त्यापैकी 7 आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धा आहेत. जगभरात भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नाझचा हा प्रवास सोपा नव्हता. दिल्लीतील एका संपन्न कुटुंबात जन्मलेल्या नाझच्या कुटुंबीयांनी त्यांचा मुलगा ट्रान्सजेंडर असल्याचे कळल्यावर त्याचा तिरस्कार करायला सुरुवात केली.

# प्रेमाबद्दल केला होता मोठा खुलासा

मराठीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे सायली संजीव. आज ती तिचा ३० वा वाढदिवस साजरा करत आहे. चित्रपट, मालिका या दोन्ही माध्यमात काम करून आपल्या अभिनयाचा वेगळा ठसा उमटवणाऱ्या सायली संजीवचा प्रचंड मोठा चाहतावर्ग आहे. सायलीच्या कामबरोबरच तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेण्यासाठी तिचे चाहते उत्सुक असतात. तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल नेहमीच चर्चा रंगलेल्या दिसतात. अशातच एका मुलाखतीत तिने तिच्या कॉलेजच्या दिवसांमधील प्रेमाचा खुलासा केला होता. काही महिन्यांपूर्वी सायलीने सुबोध भावेच्या 'बस बाई बस' या कार्यक्रमात हजेरी लावली होती. यावेळी तिने भरभरून गप्पा मारल्या. तिने तिच्या आयुष्याबद्दल कोणालाही माहीत नसलेल्या अनेक गोष्टी शेअर केल्या. या संवादादरम्यान एका प्रश्नाचं उत्तर देताना तिने तिच्या कॉलेजच्या दिवसांमधील प्रेमाबद्दल सांगितलं होतं.ती म्हणाली होती, "मी बऱ्यापैकी स्पष्टवक्ती आहे. माझ्या जे मनात असेल ते मी बोलून मोकळी होते आणि आपल्याला जर एखादा मुलगा आवडत असेल तर आपण त्याला प्रपोज करावं. पण कॉलेजमध्ये असताना मी ज्या मुलांना प्रपोज केलं, त्यापैकी एकाही मुलाने मला होकार दिला नाही." सायलीच्या या उत्तराने तिथे उपस्थित असलेल्या सर्वांनाच फार आश्चर्य वाटलं होतं. पुढे सायली म्हणाली होती की, "आज हा एपिसोड ते बघत असतील. त्यांना हा प्रसंग बरोबर आठवेल." तिने सांगितलेला हा किस्सा चांगलाच गाजला होता. दरम्यान सायली संजीव काही महिन्यांपूर्वी 'पैठणी' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. तर आता यावर्षीही ती वैविध्यपूर्ण भूमिका साकारताना दिसणार आहे. नुकताच २०२१ साली प्रदर्शित झालेल्या आणि प्रचंड गाजलेल्या तिच्या 'झिम्मा' या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची घोषणा करण्यात आली.





# वयाबद्दलच्या प्रश्नावर ऐश्वर्या नारकर यांचा खुलासा

झी मराठी वाहिनीवरील 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मालिका सध्या चर्चेत आहे. या मालिकेमध्ये अभिनेत्री ऐश्वर्या नारकर नकारात्मक भूमिका साकारत आहेत. रुपाली राजाध्यक्ष हे त्यांचं मालिकेमधील पात्र प्रेक्षकांच्याही पसंतीस पडत आहे. मराठी सिनेसृष्टीतील एव्हरग्रीन अभिनेत्री म्हणून त्यांना ओळखले जाते. ऐश्वर्या नारकरने या वयाच्या पन्नाशीतही तितक्यात तरुण आणि फिटनेस फ्रीक दिसतात. नुकतंच एका मुलाखतीत त्यांनी त्यांच्या वयाबद्दल खुलासा केला आहे. ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. त्यांच्या सौंदर्याची भूरळ आजही लोकांना पडलेली असते. नुकतंच ऐश्वर्या नारकर यांनी एका मुलाखतीत त्यांच्या वयाबद्दल मोठे भाष्य केले आहे. त्यावेळी त्या म्हणाल्या, "माझी पन्नाशी उलटलेली नाही. सोशल मीडियावर माझ्या वाढदिवसाची तारीख चुकीची टाकलेली आहे. त्यामुळे त्यात थोडा घोळ होतो." "माझ्या आजूबाजूला असलेले अनेकजण मला माझ्या वयाबद्दल विचारताना दिसतात. ते मला सारखं सांगत असतात की आपलं वय इतकं नाही. पण ठिक आहे. मी पन्नाशीच्या जवळपास पोहोचले आहे. तुम्ही वयाच्या कुठल्याही स्टेजला असला तरी फिटनेस हा आयुष्यात महत्त्वाचा असतो.फिटनेस हा स्वत:ला प्रसन्न वाटावं, उत्साही वाटावं म्हणून करायचा असतो.ेस हा आपल्या लाइफस्टाइलचा भाग असला पाहिजे. फक्त यावर्षीपासून करु हा संकल्प करण्यापेक्षा तो नियमित करायला हवा. मी वयाच्या १५ व्या वर्षापासून योगा करतेय. पण आता आता ते लोकांसमोर मी आणायला लागले", असे ऐश्वर्या नारकर यांनी सांगितले.

# SAFF फुटबॉल स्पर्धा: भारताने नवव्यांदा पटकावले जेतेपद!

## कुवेतवर शूटआउटमध्ये मात, भारताची दमदार कामगिरी

महाईन्यूज । बेंगळुरू। वृत्तसंस्था

**भारतीय संघाने पेनल्टी शूटआउटमध्ये कुवेतवर ५-४ने मात करून सॅफ फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. भारतीय संघ या स्पर्धेत नवव्यांदा चॅम्पियन ठरला. भारताने यापूर्वी ही स्पर्धा १९९३, १९९७, १९९९, २००५, २००९, २०११, २०१५, २०२१मध्ये ही स्पर्धा जिंकली आहे. यात भारताचा गोलकीपर गुरप्रितसिंग संधूने उत्कृष्ट बचाव करून भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. उपांत्य फेरीतही संधूने शूटआउटमध्ये भक्कम बचाव केला होता.**



### कस पाहणारी लढत

कंठीरवा स्टेडियममध्ये ही फायनल रंगली. या लढतीसाठी चाहत्यांचा मोठा प्रतिसाद भारतीय संघाला मिळाला. फिफा क्रमवारीत भारत १००व्या, तर कुवेत १४१व्या क्रमांकावर आहे. मागील चार आंतरराष्ट्रीय लढतीत कुवेतने दोन वेळा भारताला नमविले होते, तर एक लढत भारताने जिंकली होती आणि एक लढत बरोबरीत सोडविली होती. याच स्पर्धेत भारत-कुवेतमधील लढत १-१ अशी बरोबरीत सुटली होती. त्यात भारताने उपांत्य फेरीत लेबनॉनवर पेनल्टी शूटआउटमध्येच मात केली होती. त्यामुळे सुनील छेत्रीच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा कस लागेल, हे निश्चित होते. आणि घडलेही तसेच.

दोन्ही संघांनी आक्रमक खेळ केला. मात्र, मुबारक अल फानिनी आणि अबुल्ला अल ब्लाउशी यांनी उत्कृष्ट चाल रचली. त्यांनी दिलेल्या पासवर शाबैब अल् खल्दीने चौदाव्या मिनिटाला गोल करून कुवेतला आघाडी मिळवून दिली होती. याच्या नऊ मिनिटानंतर लालिअॅन्झुला चेंगटेचा गोल कुवेतचा गोलकीपर अब्दुल रहमानने रोखला. यानंतर ३९व्या मिनिटाला चेंगटेने गोल करून भारताला बरोबरी साधून दिली. मध्यंतरापर्यंत ही बरोबरी कायम होती.

उत्तरार्धातही दोन्ही संघांनी तोडीस तोड खेळ केला. दोन्ही संघांना गोल करण्याच्या संधी मिळाल्या. मात्र, या संधींचे सोने काही करता आले नाही. यानंतर ३० मिनिटांच्या अतिरिक्त वेळेतही नाट्यमय घडामोडी घडल्या. यात खेळाडूंना दुखापती झाल्या, काहींना यलो कार्ड्स मिळाले. कॉर्नर मिळाले. मात्र, दोन्ही संघांकडून गोल झाला नाही. त्यामुळे पेनल्टी शूटआउटचा अवलंब करण्यात आला. यातही ४-४ अशी बरोबरी झाली.

# मराठी माणूस निवडणार आता भारताचा संघ!

## अजित आगरकरची बीसीसीआयमध्ये झोकात एंट्री

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**बीसीसीआयच्या निवड समिती अध्यक्षपदासाठी अजित आगकर हा परफेक्ट खेळाडू आहे, असे म्हटले जात होते आणि हीच गोष्ट आता पाहायला मिळाली आहे. बीसीसीआयमध्ये अजून एका मराठी माणसाची वर्णी लागली आहे. अजित आगरकरकडे आता भारतीय संघ निवडण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बीसीसीआयने नुकतीच ही माहिती जाहीर केली.**

बीसीसीआयने एक ट्विट केले आहे. या ट्विटमध्ये अजित आगरकर आता भारताच्या निवड समितीचा अध्यक्ष असेल, अशी माहिती त्यांनी दिली आहे. यापूर्वी आशीष शेलार हे बीसीसीआयमध्ये कोषाध्यक्ष या पदावर आहेत. त्यानंतर आता अजित बीसीसीआयमध्ये जाणारा दुसरा मराठमोळा व्यक्ती ठरला आहे. कारण आता भारतीय संघ निवडण्याची जबाबदारी त्याच्यावर असणार आहे. अजित आगकरने बराच काळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले आहे, त्यामुळे त्याला क्रिकेटचा चांगलाच अनुभव आहे. त्याचबरोबर अजित आगरकरची स्वतः ची एक भूमिका कायम राहीलेली आहे. यापूर्वी एक समालोचक म्हणूनही त्याने काम केले असल्यामुळे त्याने सध्याचे क्रिकेट जवळून पाहिले आहे. यापूर्वी निवड समिती अध्यक्षाला स्वतःची भूमिका नसल्याचे म्हटले गेले आहे. त्यामुळे अजितची निवड करत बीसीसीआय एक सकारात्मक संदेश सर्वांना या माध्यनातून देऊ शकते. त्यामुळे अजित आगरकर यांची निवड समितीमध्ये वर्णी लागू शकते, असे म्हटले जात होते आणि तेच आता पाहायला मिळाले आहे.

अजित आगरकरने आंतरराष्ट्रीय स्तरावर दमदार कामगिरी तर केलीच आहे. पण क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यावरही तो क्रिकेटमध्ये सक्रीय राहीला. अजित हा दिल्ली कॅपिटल्स संघाच्या सहायय्क प्रशिक्षक पदावर कार्यरत होता. त्यामुळे अजितला प्रशिक्षकपदाचा अनुभव आहे. पण सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अजितने काही वर्षांपूर्वी मुंबईच्या निवड समितीचा अध्यक्ष होता.

त्यामुळे तो भारताच्या निवड समितीचे अध्यक्षपदी सांभाळू शकतो, असे म्हटले जात होते आणि हीच गोष्ट आता समोर आली आहे. त्यामुळे भारतीय संघ निवडण्याची जबाबदारी आता अजितवर असेल.



गेल्या काही दिवसांपासून अजितच्या नावाची जोरदार चर्चा सुरु होती. पण बीसीसीआयने आज अखेर एक ट्विट केले आणि त्यांनी याबाबतची माहिती सर्वांना दिली आहे. एक ट्विट करत त्यांनी ही माहिती प्रसारित केली आहे.